


# बदलाच्या दिशेने :
# एकेक पुस्तक,
# एकेक मूल

PRATHAM BOOKS

वार्षिक अहवाल
२०२२-२०२३

# व्यवस्थापकीय अहवाल

**९३ लाख मुद्रित पुस्तके आणि स्टोरी कार्ड्स**

**५०,००० हून अधिक डिजिटल पुस्तके**

**३३२ भाषा (२१५ स्वदेशी भाषा)**

**३.४० कोटी वेळा वाचली गेली**

## पुस्तकं म्हणजे बदलाचे दूत!

*“Books are a uniquely portable magic.”—Stephen King*

लहान मुलांना आपल्या भाषेतून पुस्तके वाचायला मिळावीत आणि मातृभाषांमधील पुस्तकांची कमतरता भरून काढली जावी या हेतूने २००४ साली ‘प्रथम बुक्स’ची स्थापना केली गेली. मागील एका वर्षातच आम्ही पुस्तकांच्या ९३ लाख मुद्रित स्वरुपातील प्रती उपलब्ध करून दिल्या आहेत. आजपर्यंतच्या आमच्या कारकिर्दीच्या इतिहासातील हे सर्वांत मोठे यश आहे. आमचा मोफत डिजिटल प्लॅटफॉर्म ‘स्टोरीविव्हर’वर ३३२ विविध भाषांतील ५०,००० पुस्तकेही आम्ही उपलब्ध करून दिली आहेत. या भाषांपैकी सुमारे २१५ भाषा या पूर्णत: स्वदेशी आहेत. मागील वर्षी नव्याने समावेश करण्यात आलेल्या ८८% भाषा स्वदेशी होत्या, ज्यांमध्ये अतिशय दुर्मीळ आणि आता कालबाह्य होत चाललेल्या बुरा, एझ्यां, नानाई, रुसयीन आणि लेपचा या भाषांचाही समावेश करण्यात आलेला आहे.

आमच्या कामकाजाचे तीन प्रमुख स्तंभ म्हणजे *निर्मिती, उपलब्धता* आणि *बदल घडवून आणणे*. मातृभाषांमधील पुस्तकांची निर्मिती हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आजपर्यंत लहान मुलांसाठी ५००० हून अधिक पुस्तके आम्ही प्रकाशित केली आहेत. अर्थात याचे श्रेय आम्हाला सहयोग देणाऱ्या भागीदार संस्था, व्यक्ती आणि निर्मिकांना आहे. स्व-भान, स्त्री-पुरुष समानता, हवामान बदल, सामाजिक कार्य आणि कार्यकर्ते, सामाजिक आणि भावनिक शिक्षण अशा विविध विषयांना स्पर्श करणारी ही पुस्तके असल्याने त्यांतून विविधता आणि सर्वसमावेशकता हे दोन्हीही हेतू साध्य होतात. आनंद आणि प्रेरणा देणारी, तसेच विचार करायला भाग पाडणारी अनेकविध व्यक्ती, त्यांचे विचार आणि त्यांचे प्रवास मांडणारी ही पुस्तके आहेत. देशभरात आणि जगात इतर ठिकाणीही, शाळेच्या वर्गांमधून, सार्वजनिक वाचनालयांमधून ते थेट मुलांच्या हातात ही पुस्तके उपलब्ध व्हावीत या हेतूनेच

आमचे काम चालते. मागील वर्षांत आणि त्याआधीही आम्ही निर्माण केलेल्या पुस्तकांना अनेक पुरस्कार तर मिळाले आहेतच, शिवाय आमच्या कामाची प्रशंसाही झाली आहे.

मुख्यतः समाजाच्या तळागाळातील आणि ज्यांना फारशा सुविधा उपलब्ध नाहीत अशी मुले आणि शिक्षकांनाही आमची आनंददायी पुस्तकं उपलब्ध व्हावीत हेच आमचे ध्येय आहे. आमची पुस्तके मुद्रित, ऑडिओ आणि डिजिटल स्वरूपांतही विविध वाचनासाठीच्या मंचांवर उपलब्ध आहेत. मागील वर्षी आम्ही छत्तीसगढ, गोवा, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्य सरकारांच्या सहयोगाने समाजातील वंचित घटकांतील लहान मुलांना आमची पुस्तके मिळावीत अशी तरतूद केली आहे. यामध्ये मुद्रित पुस्तके, डिजिटल बुक्स आणि ऑडिओबुक्स या सर्वच प्रकारांचा समावेश होता.

आमचा पुरस्कारप्राप्त मोफत डिजिटल मंच म्हणजेच स्टोरीविव्हर, १० स्थानिक भाषांमध्ये (साईट लँग्वेजेस) उपलब्ध असून, तो कुठूनही, तसेच ऑनलाइन किंवा ऑफलाइन मोडमध्येही तुम्ही वापरू शकता. वर्षभरात, भारतातील आणि अन्य १५० देशांमधील लहान मुलांनी, पालकांनी आणि शिक्षकांनी त्यांच्या मातृभाषेतून उपलब्ध करून दिली गेलेली आमची पुस्तके वाचली आहेत. ज्यांना इंटरनेट सेवेचा लाभ घेता येणे शक्य नाही अशांसाठी आमची – 'मिस्ड कॉल दो, कहानी सुनो' ही सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याद्वारे आमची हिंदी, मराठी, कन्नड, गुजराती, उर्दू आणि इंग्लिश या भाषांमधील ऑडिओबुक्स ऐकता येतील.

पुस्तकांच्या माध्यमातून वाचन आणि आकलन ही दोन्ही कौशल्ये वाढीस लागावीत यासाठी आम्ही विविध उपक्रम राबवत असतो आणि त्याद्वारे बदल घडवू पाहतो.

पुस्तके ही बदलाची प्रवर्तक असतात. रुडिन सिम्स बिशप या विद्वानांच्या म्हणण्याप्रमाणे ती वाचकांसाठी बाहेरच्या जगात डोकावण्यासाठीची खिडकी, किंवा आरसा असतात. विविध माणसे, जागा आणि अनुभवांशी निगडित विविध दृष्टिकोन पुस्तके वाचकांना देतात. ते दृष्टिकोन त्यांच्या स्वतःच्या अनुभवांपेक्षा खूप वेगळे आणि समृद्ध असतात. नवीन जगात प्रवेश करून नवे अनुभव ज्यांच्याद्वारे घेता येतात अशी ही पुस्तके म्हणजे जणू काचेचे सरकते दरवाजे असतात. पुस्तके आरसेदेखील असतात, कारण वाचकाला स्वतःकडे बघण्याचा आणि स्वतःला समजून घेण्याचा दृष्टिकोन ती देतात. पुस्तकांतील विविध पात्रे आणि त्यांच्या अनुभवांच्या आधारे वाचक स्वतःच्या आयुष्याला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतो.

'मुक्त पुस्तके, उघडे दार, मुक्त मनाचा हा संचार' (लिंगभावाबद्दलचा कार्यक्रम) : आमचा 'गोष्टीच्या पुस्तकांमधून स्त्री-पुरुष समानता' हा उपक्रम प्राथमिक शाळेतील तिसरी ते पाचवीच्या मुलांना स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व समजावून देण्यास अतिशय उपयुक्त आहे. त्यासाठी विशेष मेहनत घेऊन आम्ही वाचकांसाठी चार निरनिराळ्या वाचनपातळ्यांवर तयार केलेल्या पुस्तकांचा संच आहे. यात विविध उपक्रमांसाठी तपशीलवार सत्र योजना देखील आहे. हा संच मुलांचा स्त्री-पुरुष समतेकडे बघण्यासाठीचा सकारात्मक दृष्टिकोन घडवण्यास उपयुक्त आहे.

इयत्ता १ली ते ३री मधील मुलांचे हिंदी आणि मराठीमधील वाचनकौशल्य आणि आकलन वाढवणे, हा स्टोरीविव्हरवरील फाउंडेशनल लिटरसी प्रोग्रॅमचा उद्देश आहे. मुलांना त्यांच्या पातळीनुसार तयार केलेली गोष्टीची पुस्तके देण्यात येतात. त्यासोबतची वर्कशीट्स आणि प्रोग्रेस ट्रॅकर्स यांसारखी मूल्यांकन साधने निपुण भारत मार्गदर्शक तत्त्वांद्वारे वर्णन केलेल्या श्रेणीनुसारच्या अध्ययन निष्पत्तीशी जोडलेली आहेत. 'असर'च्या सहकार्याने विकसित केलेले आधाररेषा / निष्कर्षरेषा मूल्यांकनदेखील या कार्यक्रमाची परिणामकारकता मोजण्यासाठी अंतर्भूत केलेले आहे.

छत्तीसगड राज्याच्या शिक्षण विभागाने आमचा स्टोरीविव्हर फाऊंडेशनल लिट्रेसी प्रोग्राम, मुद्रित पुस्तकांच्या स्वरूपात राबवला आहे. यात २५० मास्टर ट्रेनर्ससह पाच झोनल मास्टर प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत, जे राज्यभरातील ९०,००० शिक्षकांना प्रशिक्षित करतील. राज्यातील २६ लाख मुलांपर्यंत एकूण ५४ लाख मुद्रित पुस्तके पोहोचलेली आहेत.

गोव्याचे शिक्षण संचालनालय आणि एससीईआरटी (SCERT) यांच्या सहयोगाने, इयत्ता १ली ते ८वीतील मुलांना वाचनानंदाची ओळख करून देणारा उपक्रम राज्यातील सर्व

शाळांमध्ये सुरू करण्यात आला. यामध्ये गोष्टीच्या पुस्तकांसह, इयत्तेनुसार तयार केले गेलेले विविध विषय आणि शब्दसंग्रह तसेच इंग्रजी, मराठी व कोकणी भाषांतील डिजिटल आणि मुद्रित पुस्तक वाचन उपक्रमासाठी सुचवण्यात आलेले वेगवेगळे खेळ यांचा समावेश होता.

युनिसेफ, एससीईआरटी आणि औरंगाबादच्या प्रादेशिक शैक्षणिक प्राधिकरण (आरएए) यांच्या सहयोगाने उर्दू वाचन उपक्रम २१ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाचे निमित्त साधून राबवण्यात आला. यासाठी ऐंशी उर्दू पुस्तके विकसित केली गेली व ८८० शाळांमधून ३७,००० मुद्रित पुस्तकांच्या प्रतींचे वाटप करण्यात आले.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) सहकार्याने आम्ही नवोदित विद्यार्थी लेखकांसाठी एक विशेष उपक्रम केला. याद्वारे ‘स्टोरीविव्हर’च्या माध्यमातून सीबीएसईच्या २५,००० शाळांपर्यंत पोचता आले.

देशभरात क्राउडफंडींगच्या साहाय्याने लहान मुलांसाठीची वाचनालये सुरू करता यावीत, व अधिकाधिक मुलांना वाचनाचा आनंद मिळावा यासाठी आम्ही ‘डोनेट अ बुक’ ही मोहीमदेखील राबवली आहे. यात आम्ही ५५ हजारांहून अधिक मुद्रित पुस्तके व सुमारे ३०० लायब्ररी इन अ क्लासरूम किट्सचे वितरण केले आहे. देशातील ५० हून अधिक शहरांमधील २ लाख ३० हजार मुलांपर्यंत आम्ही हे वाचनसाहित्य पोहोचवले आहे.

आमचे सर्व देणगीदार, सहयोगी आणि स्वयंसेवक यांचे आम्ही मनापासून आभार मानतो. त्यांच्या भक्कम पाठिंब्याखेरीज ही मोहीम राबवणे आम्हाला शक्य झाले नसते. सर्जनशीलता, सहकार्य, सर्वसमावेशकता आणि सहानुभूती यांच्या माध्यमातून देशभरातील लहान मुले आणि शिक्षक यांकरता चांगले बदल घडवून आणण्यासाठी आम्ही कायमच वचनबद्ध आहोत.

प्रथम बुक्सचे सहकारी आणि विश्वस्त यांच्यावतीने,

आर श्रीराम
संचालक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त





# पुस्तकं म्हणजे उत्सुकता!









पुस्तके मुलांना जणूकाही एका जादूच्या सफरीवर नेतात - ज्ञात आणि अज्ञात, जुन्या आणि नवीन, वास्तव आणि विलक्षण जगात पाऊल टाकण्यासाठी. हवामान संकटापासून ते स्त्री सक्षमीकरणापर्यंत, संस्कृतीपासून सामाजिक आणि भावनिक शिक्षण (एसईएल) आणि पोट धरून हसवणाऱ्या गोष्टींपर्यंत, अशा सर्व विषयांवरची आमची पुस्तके वाचन आनंददायी करतात.

'सूर्य आला!' हे राजीव आईप यांचे पुस्तक निसर्गातील चमत्कार उलगडून दाखवते, तर अपर्णा कपूर यांनी लिहिलेले आणि कृष्ण बाला शेणॉय यांच्या चित्रांनी सजलेले 'अंधाराचा आवाज कसा असतो' हे पुस्तक आपल्या दैनंदिन जगण्यात येणाऱ्या भावना आणि गंमती-जमतींचे चित्रण करते. 'आम्ही आहोत आशावादी : हवामानबदलाविषयी मुलांना काय वाटतं?' हे पुस्तक देशाच्या विविध भागांतील १५ मुलांची हवामानबदलाविषयीची मतं आपल्यापर्यंत पोचवते. १४ उत्तम कलाकारांनी या मुलांच्या भावना चित्रबद्ध केल्या आहेत, तर काही पूरक मजकुराचे लेखन राधा रंगराजन यांनी केलेले आहे.

लहान मुलांसाठीची ही पुस्तके मनोरंजन तर करतातच, पण सोबत त्यांना प्रेरणाही देतात. 'ग्रेस : विज्ञान शिक्षणाची दारे सर्वांना खुली करण्यासाठी एका इंजिनियरने दिलेला लढा' हे पुस्तक एका पारलिंगी इंजिनिअर आणि कार्यकर्त्याची प्रेरक गोष्ट सांगते. सायंतन दत्त यांनी हे पुस्तक लिहिले असून प्रिया दाली यांनी त्यासाठी चित्रे काढली आहेत. 'गोल!' हे नेहा सिंग आणि सबाह खान यांनी लिहिलेले आणि अल्फिया हसन आणि पायरो यांच्या चित्रांनी सजलेले पुस्तक खेळांमुळे आपल्याला मिळणाऱ्या स्वातंत्र्यावर भाष्य करते.

नेहा सिंग यांनी लिहिलेले आणि शुभश्री माथूर यांनी चित्रांकन केलेले ‘अवकाशातले गाणे : केसरबाई केरकर’ हे पुस्तक पृथ्वीवरील विविध आवाज अवकाशात घेऊन जाणाऱ्या प्रवासाची गोष्ट सांगते. या यानामधील तबकडीमध्ये विख्यात भारतीय गायिका केसरबाई केरकर यांचा आवाजही आहे.

कनातो जिमो यांचे ‘अफो आणि मी’ हे पुस्तक हवामानबदलाच्या संकटावर केलेले एक सर्जनशील भाष्य आहे. अनू चौधरी-सोराबजी यांनी लिहिलेले ‘संग्रहालयातला एक दिवस’ हे पुस्तक भारतीय कलेला वाहिलेले आहे. या पुस्तकातील चित्रे काढली आहेत आघाडीचे कालीघाट पट कलाकार अन्वर चित्रकार यांनी. गझल काद्री यांचे ‘सोंथ आला रे!’ हे पुस्तक काश्मीरमधील सुंदर हिवाळा जणू आपल्या डोळ्यांसमोर जिवंत करते. निवेदिता सुब्रमण्यम यांचे ‘गुप्तहेर दमयंती’ हे पुस्तक गुप्तहेर दमयंतीची सुरस कथा मांडते. दीपांजना पाल यांचे ‘पुचकूचे साहस’ प्रथम बुक्सची प्रसिद्ध पात्रे पुचकू आणि तिचे मित्र बोलटू आणि डोडला यांना पुन्हा एकदा वाचकांच्या भेटीला घेऊन येते. राजीव आईप यांनी या पुस्तकांसाठी चित्रे काढली आहेत, तर कलादिग्दर्शन मैथिली दोशी यांनी केलेले आहे.

सिंगापूर बुक कौन्सिलसोबत आम्ही केलेल्या सहयोगाचा एक भाग म्हणून, प्रथम बुक्सने एशियन फेस्टिव्हल ऑफ चिल्ड्रन्स कन्टेन्ट २०२२ मध्ये एक व्हर्चुअल हॅकेथॉन आयोजित केली होती. भारतभरातून तसेच दक्षिणपूर्व आशियामधून एकूण १८ स्पर्धक यात सहभागी झाले होते. पाच लेखक, पाच चित्रकार, चार लेखक चित्रकार आणि चार अनुवादक असे हे एकूण १८ जण होते. या दोन दिवसांत आम्ही ९ पुस्तकांच्या निर्मितीला चालना दिली. प्रत्येक पुस्तक हे एकाहून अधिक भाषांत (हिंदी, तमिळ, चिनी आणि मल्याळम) उपलब्ध करून दिले गेले. काही भाषांतरे म्हणून, तर काही द्विभाषिक पुस्तके म्हणून. या सर्व पुस्तकांचे नंतर महोत्सवामध्ये दूरस्थ पद्धतीने प्रकाशन करण्यात आले.

प्रथम बुक्सची मूल्ये आणि तत्त्वे अधोरेखित करण्यासाठी आम्ही युनिसेफच्या सहयोगाने ‘द वर्ल्ड वी लिव्ह इन, द वर्ड्स वी क्रिएट’ ही मुक्त स्रोत हस्तपुस्तिका तयार केली आहे. मुलांना अधिक वैविध्यपूर्ण आणि सर्व समावेशक अनुभव देणारी चित्रंपुस्तकं तयार व्हावीत, हा यामागचा हेतू.









**“कोरोना महासाथीचा वाचनावर काय परिणाम झाला?”**
**“चला, काही प्रेरणादायी ग्रंथपाल आणि प्रशिक्षकांना भेटू या.”**
**“वाचकांना आमची पुस्तके कशी वाटतात?”**

आमच्या टीमने जेव्हा ‘रीड विथ मी’ योजना तयार करायला घेतली, तेव्हा असे अनेक प्रश्न आणि विषय आमच्या मनात होते. कोरोनोत्तर जगातील साक्षरता आणि वाचनसवयी यांचा अंदाज घेण्यासाठी आम्ही देशातील अनेक ग्रंथालये, कम्युनिटी सेंटर्स आणि शाळांना भेटी दिल्या.

युनिसेफच्या (UNICEF) लिंग समभाव योजनेद्वारे प्रथम बुक्सच्या ‘स्टोरीविव्हर’ने ‘ओपन बुक्स, ओपन डोअर्स, ओपन माइंड्स : जेंडर ट्रान्सफॉर्मेशन थ्रू स्टोरीबुक्स प्रोग्राम’ या कार्यक्रम सुरू केला आहे. विविध वाचनपातळ्यांसाठी तयार केलेली पुस्तके व त्याचबरोबर शिक्षकांसाठीची सत्र योजना यात उपलब्ध करून दिलेली आहे. यामध्ये मेनका रामन लिखित आणि एकता भारती यांच्या चित्रांनी सजलेले ‘मला मी आवडते!’, प्रिया कुरियन यांचे ‘हरवलेली सुंदरी’ अशा पुस्तकांचा समावेश आहे. ‘मला मी आवडते’ हे पुस्तक सौंदर्याच्या घट्ट रुजलेल्या कल्पना आणि पूर्वग्रहांविषयी भाष्य करते. तर ‘हरवलेली सुंदरी’मध्ये मुख्य व्यक्तिरेखा जिन्सी नावाची एक स्त्री पोलीस इन्स्पेक्टर आहे.

या उपक्रमात प्राथमिक शाळेतील इयत्ता १ली ते ५वीमधील मुलांना स्त्री-पुरुष समानतेबद्दल जागरुक करण्यासाठी या पुस्तकांचा वापर केला जातो. या उपक्रमाच्या प्राथमिक पाहणीमध्ये केवळ ५१% मुलींनी ‘स्त्री-पुरुष हे दोघेही पोलीस अधिकारी होऊ शकतात असे मत मांडले होते, मात्र पण अंतिम मूल्यांकनात मात्र ९३% मुली या मतापर्यंत येऊन पोचल्या होत्या.














# पुरस्कार




## हरवलेली सुंदरी

बिनोद कनोरिया पुरस्कार – इंग्रजी नव्याने वाचणाऱ्यांसाठी चिल्ड्रन बुक पुरस्कार

बिनोद कनोरिया पुरस्कार – चित्रांकनासाठी चिल्ड्रन बुक पुरस्कार

अट्टा गलाट्टा - बंगळुरू साहित्य संमेलन – बेस्ट चिल्ड्रन पिक्चर बुक स्टोरी पुरस्कार

पराग ऑनर लिस्ट २०२३

## दुग्गा

बिनोद कनोरिया पुरस्कार – चित्रांकनासाठी चिल्ड्रन बुक पुरस्कार

अट्टा गलाट्टा-बंगळुरू साहित्य संमेलन – बेस्ट चिल्ड्रन पिक्चर बुक स्टोरी पुरस्कार

भारतीय प्रकाशक महासंघ, चिल्ड्रन्स बुक्स, जनरल इन्टरेस्ट, ०-१० वर्षे

पराग ऑनर लिस्ट २०२३

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर : ग्रंथप्रेमाने भारलेले जीवन

सर्वोत्कृष्ट साहित्यासाठी निस्सिम पारितोषिक – विशेष पुरस्कार

## असामो, तू आहेस का तिथं?

एफआयसीसीआय प्रकाशन पुरस्कार, बुक ऑफ द इयर – एकंदर मांडणीसाठी

## घर

एफआयसीसीआय प्रकाशन पुरस्कार, चिल्ड्रन्स बुक ऑफ द इयर

## नाटक की भुताटकी?

पराग २०२३ यादीत मानांकन

## वनस्पतींशी गुजगोष्टी

पराग २०२३ यादीत मानांकन

## छोट्याशा या गल्लीत

पराग २०२३ यादीत मानांकन


## जेव्हा जंगल जागं होतं

पराग २०२३ यादीत मानांकन

## ज्या जगात असते कीटकांची सत्ता


पराग २०२३ यादीत मानांकन














# पुस्तकं सर्वांसाठी!

storyweaver PRATHAM BOOKS



**२ कोटी ४० लाख वेळा वाचली गेलेली पुस्तके, ३३२ भाषा आणि ५० हजारांहून अधिक गोष्टी**

लहान मुलांच्या प्राथमिक शिक्षणासाठीचा भारताचा पहिला डिजिटल प्लॅटफॉर्म, अर्थात स्टोरीविव्हर मुलांची वाचनक्षमता वाढवण्यासाठी आणि त्यांना शिक्षण देणारी यंत्रणा सक्षम करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. या मंचावर उत्तम दर्जाची गोष्टींची पुस्तके नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहेत. वापरकर्त्यांना या पुस्तकांचे वाचन, पुनर्निर्मिती आणि भाषांतरही करता येते. दुर्मीळ आणि धोक्यात आलेल्या भाषा, तसेच स्वदेशी - स्थानिक भाषांना हा मंच प्रोत्साहन देत असून, या मंचावरील सुमारे ६५% भाषा अशा प्रकारच्या आहेत. उदा., याच वर्षी अतिशय दुर्मीळ आणि आता विस्मृतीत जात असलेल्या बुरा, एझ्र्या, नानाई, रुसयीन आणि लेपचा या भाषांमध्ये भाषांतरित करण्यात आलेली गोष्टीची पुस्तके आम्ही उपलब्ध करून दिली आहेत. याखेरीज, वाचन आणि शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासन, ग्रंथपाल, शिक्षक आणि वाचनप्रेमींच्या सहयोगाने काही विशेष अभ्यासक्रमही आम्ही तयार केले आहेत.

लहान वयातच उत्तम वाचनक्षमता विकसित व्हावी या हेतूने या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. इयत्ता १ली ते ३रीच्या मुलांसाठी चित्रांचा मोठ्या प्रमाणावर समावेश असलेली गोष्टीची पुस्तके यांत आहेत. स्टोरीविव्हर फाऊंडेशनल लिट्रेसी प्रोग्राममध्ये सुरुवातीच्या इयत्तेपासूनच भाषा-शिक्षणावर भर दिला गेलेला आहे. याखेरीज विविध वर्कशीट्स, मूल्यमापन आराखडे आणि ‘स्टोरीविव्हर रीड अलाँग्ज’ (ऑडिओ-व्हिजुअल बुक्स) म्हणजेच दृकश्राव्य गोष्टींच्या पुस्तकांचाही यात अंतर्भाव आहे. छत्तीसगढच्या बेरला आणि राजस्थानच्या रैलमाग्रा इथे झालेल्या यशस्वी क्षेत्रीय अभ्यास उपक्रमांनंतर आता छत्तीसगढ आणि महाराष्ट्रामध्ये हा

उपक्रम डिजिटल आणि मुद्रित स्वरूपातही विद्यार्थ्यांकडून स्वीकारला जात आहे.

एससीईआरटी (SCERT) आणि छत्तीसगढ व महाराष्ट्र शासनाच्या सहयोगाने स्टोरीविव्हरच्या ‘फाऊंडेशनल लिट्रेसी प्रोग्राम’मधील पुस्तके सुमारे ३० हजार शाळांमधून वितरित करण्यात आली आहेत आणि छत्तीसगढमधील २६ लाख मुलांपर्यंत ती पोचली आहेत. तसेच महाराष्ट्रातील ४२ हजार शाळांतील ४० लाख मुलांनी त्यांचा लाभ घेतला आहे.

**छत्तीसगढ**

५४ लाख पुस्तके

३०,००० शाळा

२६ लाख विद्यार्थी

**महाराष्ट्र**

२२ लाख पुस्तके

४२,००० शाळा

४० लाख विद्यार्थी

‘स्टोरीविव्हर’वर इयत्ता १ली ते ८वीच्या मुलांसाठी प्रथम बुक्सचा ‘वाचन उपक्रम’देखील उपलब्ध आहे. या वयाच्या मुलांना वाचनाची गोडी आणि सवय लागावी हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमाअंतर्गत विविध गोष्टींची पुस्तके, इयत्तानुरुप संकल्पना आणि शब्दसंग्रह आणि सुचवलेल्या विविध कृती या आता फक्त इंग्रजी आणि हिंदीतच नव्हे, तर मराठी, उर्दू, अरेबिक, फारसी, फ्रेंच आणि कोकणी या भाषांमध्येही उपलब्ध आहेत.

मुलांनी मातृभाषेतील वाचन करून लहान वयातच उत्तम शब्दसंग्रह तयार व्हावा आणि गोष्टी स्वतःच्या आयुष्याशी जोडून पाहण्याची क्षमता त्यांच्यात विकसित व्हावी, यासाठी स्टोरीविव्हर सीबीएसई, युनिसेफ, एमएससीईआरटी आणि अन्य सहयोगींच्या सोबत कार्यरत आहे. आमचा ‘द गोवा इज रिडींग’ हा राज्यव्यापी उपक्रम आम्ही गोवा शिक्षण मंत्रालयाच्या सहयोगाने राबवत आहोत. त्या राज्यातील विविध अनुदानित शाळांना याचा लाभ होत आहे.



“स्टोरीविव्हरच्या फाऊंडेशनल लिट्रेसी प्रोग्राममधील (एफएलपी) गोष्टींची रंगीबेरंगी पुस्तके अतिशय कुतूहलाने आणि आनंदाने मुलांना वाचताना मी पाहिलं आहे. दीर्घ कालावधीसाठी मोठी पुस्तके वाचण्याची मुलांची क्षमता विकसित होत असल्याचे मला खात्रीपूर्वक जाणवत आहे. हिंदी भाषा शिकण्यासाठी आता मुलांना एक अतिरिक्त स्रोत उपलब्ध आहे याबद्दल मी समाधानी आहे. आता जेव्हा मी वर्गात तास घेण्यास उपलब्ध नसते, तेव्हा विद्यार्थी एफएलपीमधील गोष्टीची पुस्तके वाचतात आणि शिकतात.”

*- गुलझार बारेथ, शिक्षक, सरकारी प्राथमिक शाळा अमोडी, जंजगीर चंपा, छत्तीसगढ*



२१ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनानिमित्त युनिसेफ (UNICEF), एससीईआरटी (SCERT) आणि प्रादेशिक शैक्षणिक प्राधिकरण (RAA), औरंगाबाद यांच्या सहकार्याने उर्दू वाचन कार्यक्रम सुरू करण्यात आला. याकरता ऐंशी उर्दू पुस्तके तयार केली गेली आणि ८८० शाळांमध्ये ३७,००० मुद्रित पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

युनिसेफ (UNICEF), महाराष्ट्र सरकार आणि शिक्षण मंत्रालय यांच्या सहयोगाने 'गोष्टीचा शनिवार' हा पाच महिन्यांचा वाचन उपक्रम राबवण्यात आला होता. गोष्टींच्या माध्यमातून मराठी, उर्दू आणि इंग्रजी या भाषांतून शिकता यावं हा यामुळे मूळ उद्देश होता. कोरोना महासाथीमुळे शालेय मुलांच्या अभ्यासाचे जे नुकसान झाले, ते काही अंशी भरून काढण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला होता. सुमारे ३ लाख शिक्षक आणि बालवाडी कर्मचाऱ्यांचा यात सहभाग होता व राज्यातील २५ लाख विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

हा उपक्रम दीर्घ काळासाठी चालू राहावा म्हणून राज्यातील विविध सहकारी घटकांच्या साहाय्याने क्षमता उभारणी मोहीम (कपॅसिटी बिल्डिंग) राबवण्यात आली. या उपक्रमाची संरचना महाराष्ट्राच्या 'निपुण भारत एफएलएन (FLN)' मोहिमेचा भाग म्हणून महाराष्ट्राच्या

'गुल्लीचा खजिना' नावाची एक गोष्ट मी केली होती. त्यामधील लहान मुलाकडे असा एक बॉक्स असतो, ज्यामध्ये त्याच्या सर्व प्रश्नांवर आणि अडचणींवर उपाय असतात. पुढील आठवड्यात वर्गात येताना मी पाहिलं, की मुलांनी पुनर्वापर करता येऊ शकणाऱ्या, पण निरुपयोगी आणि कचऱ्यात फेकण्याजोग्या वस्तू त्या गोष्टीतल्याप्रमाणेच एका बॉक्समध्ये ठेवून दिलेल्या होत्या. वाचन उपक्रम झाल्यानंतरच्या २ महिन्यांतच, मुलांना प्रत्येक गोष्टीचे मोठ्याने वाचन करावेसे वाटू लागले. या सर्वच गोष्टी समजायला अतिशय सोप्या आणि मुलांच्या आयुष्याशी मिळत्याजुळत्या असल्याने त्यांच्यात एक प्रकारचा आत्मविश्वास आला होता. त्यांची कल्पकता, आकलन, श्रवण आणि वाचनकौशल्यांमध्ये खूपच सुधारणा दिसून आली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, वाचन उपक्रमातील सर्वच गोष्टी खूप विचारपूर्वक लिहिलेल्या होत्या आणि त्या अभ्यासक्रमाला पूरक होत्या."


*- शालिनी गुप्ता, ग्रंथपाल, पुरकल यूथ डेव्हलपमेंट सोसायटी, उत्तराखंड*

शिक्षण मंत्रालयाद्वारेही स्वीकारली गेली आहे. स्टोरीविव्हर फाउंडेशनल लिट्रेसी प्रोग्राममधील पुस्तके आता २५ लाख मुलांपर्यंत पोहोचणाऱ्या राज्याच्या प्राथमिक साक्षरता आणि अंकओळख करून देणाऱ्या ग्रंथालयांचा भाग आहेत.

मुलांमधील कल्पनाशक्ती वाढीस लागावी, या हेतूने 'नवोदित लेखक लेखन उपक्रम' घेण्यात आला. यामुळे सीबीएसई वाचन मोहिमेला बळकटी मिळाली. ही मोहीम मुलांना नुसत्या वाचनाकडून हळूहळू स्वतंत्र आणि सर्जनशील लेखनाकडे वळवण्यासाठी होती. त्यादृष्टीने काही विशेष कौशल्यांचे प्रशिक्षण देणाऱ्या कार्यशाळाही घेतल्या गेल्या. हा उपक्रम २५,००० सीबीएसई शाळांमधील इयत्ता ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी राबवला गेला.

भारताच्या राष्ट्रीय कामगिरी सर्वेक्षणानुसार (नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हे, एनएएस २०१७) इयत्ता ३रीतील केवळ ५०% मुलेच गणित, विज्ञान आणि पर्यावरणशास्त्र (ईव्हीएस) या विषयांमध्ये प्राथमिक क्षमता पातळीच्या वर आहेत. प्राथमिक शाळेतील मुलांच्या विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित विषयांतील क्षमतांमध्ये (स्टेम स्किल्स) वाढ व्हावी आणि तीदेखील महागड्या सोयीसुविधांशिवाय, हेच आमच्यासमोरचे सर्वाधिक महत्त्वाचे ध्येय आहे.

"तुम्ही जर नवनवीन यंत्रे निर्माण करण्यात रस असलेले वैज्ञानिक असाल, तर तुम्ही काय तयार कराल? - त्याचे चित्र काढा आणि त्या यंत्राविषयी, त्याच्या उपयोगाविषयी ५० शब्दांत लिहा."




नवी दिल्लीच्या होली चाईल्ड माध्यमिक शाळेची इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी दिया हिने राहुल राघवन यांचे 'युक्ती केली, शिट्टी झाली' हे पुस्तक वाचून एक छोटासा स्टोव्ह काढला. आणि तो असणार होता, पहाटे पडणारी स्वप्ने साठवून ठेवणारा स्टोव्ह!

## आमच्या स्टोरीविव्हरच्या स्टेम लिट्रेसी प्रोग्रॅमला सोशल मीडियावर मिळालेल्या प्रतिक्रिया

**रिझ मलिक**
"पुस्तकांचा संग्रह आणि दर्जा खरोखरच उत्तम आहे."

**दिव्या सोळंकी**
"अतिशय सुंदर संकल्पना!"

**फ्लॉरेन्स बिबिन**
"पुस्तकांचा संग्रह फार छान आहे"

**शशी बाला व्यास कुरियल**
"सुरेख संग्रह!"-

**मनीषा जी. भिसे**
"२१ जानेवारीला मी मुरबाडला ५वी, ६वी व ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्टेम गोष्टींचा कार्यक्रम घेण्यासाठी गेले होते. मी त्यांना तुमच्या सुरेख पुस्तकांचे भांडार खुले करून दिले आहे. एक कथाकथनकार आणि शिक्षक या नात्याने ही पुस्तके सर्वांसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी प्रथम बुक्सची शतशः ऋणी राहीन."

याला प्रतिसाद म्हणून, 'स्टोरीविव्हर'ने 'स्टेम कौशल्ये साक्षरता उपक्रम'देखील सुरू केला आहे. गोष्टींच्या पुस्तकांच्या मदतीने स्टेम म्हणजेच विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या विषयांची गोडी हाच यामागील प्रमुख हेतू होता. हा उपक्रम म्हणजे शिक्षकांसाठी एक समृद्ध संदर्भसाहित्य भांडारच आहे. यामध्ये इयत्ता १ली ते ५च्या मुलांसाठी राष्ट्रीय अभ्यासक्रमाशी संलग्न असलेली २००हून अधिक पुस्तके, सुनियोजित पाठ टाचणे आणि अन्य शिक्षक प्रशिक्षण संसाधने यांचा समावेश आहे. हा उपक्रम इंग्रजी, हिंदी, मराठी, उर्दू आणि ओडिया या भाषांमध्ये उपलब्ध आहे.

# पुस्तकं दूर-दूर पोचणारी!

## मुद्रित पुस्तकांचा प्रभावी वापर

९३ लाख पुस्तके

६,८१५ वर्गातील ग्रंथपेट्या

१३ भारतीय भाषा

२५ राज्ये आणि
४ केंद्रशासित प्रदेश

पुस्तकं काळ आणि अंतराचे बंधन ओलांडून मुलांपर्यंत सहज जाऊन पोचतात आणि त्यांना प्रभावित करतात. यावर्षी आमच्या सहकाऱ्यांनी भारतातील व जगभरातील मुलांना वाचनाचा आनंद मिळवून दिला.





















आम्ही एचसीएल फाउंडेशनसारख्या संस्थांच्या मदतीने देशभरातील हॅपी स्कूल्सपर्यंत ८९,३०० पुस्तके पोचवली आहेत. देशातील १,३६,१७६ कुमारवयीन मुलांच्या वाचनानंदासाठी तब्बल ७७७ वाचनालये सुरू केली आहेत. नोयडा इथल्या ज्युबिलंट भारतीय फाउंडेशनच्या ११ राज्यांतील २४० गावांमधील १० लाख मुलांना वाचन, आकलन आणि शिक्षणासाठी ८२ हजार ४०० पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. युनायटेड वे मुंबईच्या 'लेट्स रीड' अर्थात चला, वाचू या! उपक्रमासाठी वंचित समाजातील ११,५४० मुलांना ८४,६२५ पुस्तकांचा लाभ करून दिला आहे. आसिफाबादच्या जिल्हा प्रजा परिषदेला जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींपर्यंत ३५ हजार पुस्तके पोहोचवण्यासाठी मदत केली आहे. तसेच त्या परिसरातील सर्व मुलांना लाभ घेता यावा, यासाठी ३५३ फिरत्या वाचनालयांची (हँगिंग लायब्ररीज) स्थापना केली आहे.

१७,००० फूट फाउंडेशन (लडाख व सिक्कीम), समग्र शिक्षा (दादरा, नगर हवेली, दमण आणि दीव), नवसहयोग फाउंडेशन (कर्नाटक), की एज्युकेशन फाउंडेशन (कर्नाटक), थिंकशार्प फाउंडेशन (महाराष्ट्र आणि गुजरात), बालमित्र फाउंडेशन (आंध्रप्रदेश), जेसीबी लिटरेचर फाउंडेशन (दिल्ली, हरियाणा, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र), वाणी प्रेस (कर्नाटक), पीपल्स ॲक्शन फॉर नॅशनल इंटिग्रेशन - पानी (उत्तर प्रदेश), आणि आझाद इंडिया फाउंडेशन (बिहार) अशा अनेक संस्थांशी भागीदारी करून आम्ही हजारो मुलांना वाचनानंद मिळवून दिला आहे.

# पुस्तकं मातृभाषेत!



कोविड-१९ महासाथीने विद्यार्थ्यांच्या शिक्षण आणि विकासाकडे अधिक व्यापक दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित केली. विद्यार्थ्यांच्या दूरस्थ किंवा ऑनलाईन शिक्षणाबाबतही काही नवी आव्हाने निर्माण झाली. साध्यासोप्या इंग्रजी भाषेतील पुस्तके मुलांसाठी उपलब्ध असणे हीसुद्धा आता काळाची गरज झाली आहे. ‘असर’च्या वाचन त्रुटींबाबत असलेल्या अहवालातून हे अधोरेखित होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एनईपी)च्या सूचनेनुसार मुलाचे पूर्वप्राथमिक शिक्षण हे त्याच्या मातृभाषेतूनच व्हायला हवे, जेणेकरून मुलांचा शिक्षणातील सहभाग वाढेल आणि विद्यार्थी गळती कमी होईल. प्रथम बुक्स भाषेची दरी भरून काढणारी आणि सर्वसमावेशक गोष्टींची पुस्तके निर्माण करण्यास कायमच वचनबद्ध असलेली संस्था आहे.

आपल्या मातृभाषेतून पुस्तके वाचायला मिळणे हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे. जास्तीत जास्त मुलांना त्यांच्या मातृभाषेतून वाचण्याचा आनंद घेता यावा यासाठी आमच्या अनुवादकांनी ही पुस्तके फारशा ज्ञात नसलेल्या कोलामी, गोंडी, पावरी आणि कोरकू या भाषांमध्येही अनुवादित केली आहेत.

केंद्रीय भारतीय भाषा संस्थेच्या भारतीय भाषा उत्सवात भारतीय भाषांमधील बालसाहित्यावर आधारित सादरीकरण करण्यासाठी प्रथम बुक्सला निमंत्रित करण्यात आले होते.

## अंगणवाडी ईसीई प्रायोगिक उपक्रम

**१० अंगणवाड्या**
**१३४ मुले, १० आठवडे**
**४५ ते ६० मिनिटे प्रति दिवस**
**विविध उपक्रम आणि**
**गोष्टी सांगण्यासाठी निवडलेली २५ पुस्तके**













आमची कन्नड भाषेतील पुस्तके ही ईसीई रिडींगच्या पथदर्शक कार्यक्रमाचा (पायलट प्रोग्रॅम) एक भाग होती. हा कार्यक्रम कर्नाटकमधील १० शहरी आणि ग्रामीण केंद्रांमध्ये घेण्यात आला. या कार्यक्रमामुळे मुलांमध्ये झालेले बदल खूप समाधानकारक होते. मुलांचे प्रतिसाद, भाषिक कौशल्ये यांमध्ये खूपच सुधारणा दिसून आली. शहरी आणि ग्रामीण अशा दोन्हीही केंद्रांमध्ये हे परिणाम दिसून आले. मुलांचा शब्दसंग्रह, आकलन, भाषिक अभिव्यक्ती क्षमता, ध्वनीशास्त्र समजण्याची क्षमता यांत संख्याशास्त्रीय दृष्टिकोनातूनही खूप चांगला फरक पडलेला दिसून आला.

या पुस्तकांमुळे ज्या सहजतेने मुले प्रकट वाचनाकडे वळली, याची अनेक शिक्षकांनी आवर्जून नोंद घेतली. मुद्रित पुस्तकांबाबतची समजदेखील खूप वाढली आहे . यामुळे मुले आधीपेक्षा जास्त प्रमाणात पुस्तकांकडे वळू लागली आहेत.



# पुस्तकं, समाजाला एकत्र आणणारी!









एक दिवस, एक गोष्ट या उपक्रमाचे १०वे वर्ष विशेष महत्त्वाचे ठरले, कारण हा उपक्रम पुन्हा त्याच्या मूळ ऑफलाईन स्वरूपामध्ये सुरू झाला. आधीची २ वर्षे तो दूरस्थ पद्धतीनेच झाला होता.

याप्रसंगी प्रिया कुरियन यांच्या 'हरवलेली सुंदरी' आणि कविता पुण्यमूर्ती यांच्या 'डरॉव डरॉव' या पुस्तकांचे देशभरातील उत्साही कथनकारांनी वाचन केले. अगदी मोठ्या शहरांपासून ते बिहारच्या ठाकूरगंज, महाराष्ट्रातील नाशिक, तामिळनाडूतील कराईकुडी आणि छत्तीसगढमधील सुकमा अशा लहान शहरांमध्येही आम्ही या पुस्तकांचे वितरण केले. गोंडी आणि संथाली यांसह २५ भाषांमध्ये आम्ही गोष्टी सांगण्याच्या कार्यशाळा घेतल्या. सुमारे २ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी याचा आनंद घेतला.

याआधीच्या मागील ९ वर्षांप्रमाणेच हे वर्षही यशस्वी ठरले. याचे श्रेय जाते ३० हजार उत्साही आणि हौशी कथाकथनकारांना. त्यांनी आपल्या श्रोत्यांसाठी शाळा, ग्रंथालये, घरे, पुस्तकांची दुकाने आणि इतरत्र सुमारे १३ हजार सत्रं घेऊन गोष्टी पोचवल्या.

बुकवर्म या बंगलोरमधील सर्वाधिक जुन्या पुस्तक दुकानांपैकी एका दुकानात प्रिया कुरियन यांनी आपल्या 'हरवलेली सुंदरी' या पुस्तकाचे प्रकट वाचन केले. त्यानंतर मुलांकडून काही चित्रे काढून घेतली. व्यवसायाने कथाकथनकार असलेल्या प्रिया मुथुकुमार यांनी बंगलोरमधील स्वाभिमान कम्युनिटी लायब्ररीमध्ये आपल्या खास विनोदी शैलीत 'डरॉव डरॉव' या पुस्तकाचे वाचन केले. यानंतर मुखवटे बनवण्याचा एक छोटासा कार्यक्रमही झाला. शिक्षार्थ ट्रस्टच्या 'एक दिवस, एक गोष्ट' या सत्रामध्ये सहभागी स्वयंसेवकांनी गोंडी भाषेतील गोष्टींचे प्रकट वाचन केले. गोंडी ही मध्य भारतातील आदिवासी समुदायाची दुर्मीळ भाषा आहे.

# पुस्तकं म्हणजे चांगुलपणा!

PRATHAM BOOKS
donate-a-book











‘डोनेट अ बुक’ ही आमची मोहीम आमच्यासारखेच ध्येय असलेली मुले, शाळा, स्वयंसेवी संस्था यांना आमच्याशी जोडण्यास मदत करते. तसेच राष्ट्रीय वाचन दिन, दान उत्सव, आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन यांसारख्या विशेष दिवशी हा उपक्रम राबवण्याचा खूप सकारात्मक परिणाम होतो. आमच्या या प्रयत्नांचा लाभ समाजातील विविध घटकांना होत आहे. उदा. मणिपूरच्या मालसावम इन्स्टिट्यूटमधील विशेष मुले, उत्तर प्रदेशच्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले आणि कोडागू आणि म्हैसूर जिल्ह्यांतील विद्यार्थीगृहांमधील मुले. याशिवाय आमचे प्रयत्न विविध प्रदेशांतील सरकारी शाळांपर्यंतही पोचले असून त्यामध्ये कर्नाटक, मेघालय, हिमाचल प्रदेश, दिल्ली, सिक्कीम आणि मणिपूर या राज्यांचा समावेश आहे.

या प्रयत्नांमुळे पुस्तकांचे वाटप तर शक्य झालेच, शिवाय नवीन आणि उपयुक्त संपर्कही मिळाले. विविध प्रकारची पार्श्वभूमी आणि भौगोलिक ठिकाणी असणाऱ्या मुलांसाठी शैक्षणिक संधी निर्माण करून देण्यातही आम्ही महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

आमच्या ‘दान-उत्सव’च्या दुसऱ्या वर्षी २८ हजारांहून अधिक गोष्टीच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यासाठी फर्स्टसोर्स, मास्टेक या संस्थांनी आणि तर वैयक्तिक देणगीदारांनी सहकार्य केले आहे.

‘डोनेट अ बुक’ या मोहिमेचा परिणाम अनेक अर्थांनी व्यापक, आनंददायी आणि उत्तमोत्तम पुस्तके मुलांना सहज उपलब्ध करून देणारा आहे.

“देणगीदारांमुळे खरंच खूप मोठी मदत झाली. त्यांच्याशिवाय ही वाचनालये उभी राहणं शक्यच नव्हतं. अगदी योग्य वेळी या सर्वांनी पुढे येऊन मदत केली याबद्दल आम्ही खूप कृतज्ञ आहोत.”
*- दीपिका अपैय्या, संस्थापक, माईंड अँड मॅटर*

“नेहमीच्याच वर्गखोल्या आता अधिक उत्फुल्ल दिसतात. मुलांच्या एकाग्रता आणि संवादक्षमतेतही चांगली सुधारणा दिसून येत आहे.”
*- आशिष श्रीवास्तव, संस्थापक, शिक्षार्थ*





सोनम यांग्झोम यांनी हिमाचल प्रदेशच्या ‘स्पिती व्हॅली’मधील आपल्या गावात त्या भागातील पहिलेवहिले वाचनालय सुरू केले. पुस्तके आणि इंटरनेटच्या अभावामुळे तेथील लहान मुले आणि प्रौढांच्या शिक्षणाला आणि विकासाला मर्यादा पडत होत्या. आपल्या उपक्रमामधून उभ्या राहिलेल्या निधीमधून आपल्या मित्रमैत्रिणींच्या सहकार्याने सोनम यांनी पिन खोऱ्यातील खार या छोट्याशा गावात वाचनालय उभारले. या गावातच सोनम यांचे बालपण गेले आहे. आपल्या गावातील आणि इतर जवळपासच्या गावातील मुलांनाही गोष्टींचा जादुई खजिना उपलब्ध व्हावा अशी त्यांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची इच्छा होती. पुस्तकांमुळे त्या मुलांची विचारशक्ती, कल्पनाशक्ती वाढेल आणि स्वतःच्या आयुष्याशी ते या गोष्टी जोडून पाहायला शिकतील, हा त्यामागील मुख्य हेतू होता.

दान उत्सवादरम्यान सेंटर फॉर कम्युनिटी इनिशिएटिव्हच्या (सीसीआय) मालसावम इनिशिएटिव्ह शाळेने मुलांच्या गोष्टीच्या पुस्तकांसाठी निधी उभा केला. ही शाळा विशेष मुलांसाठी काम करते. प्रत्येक मुलाला त्याच्या वयानुरूप अशी पुस्तके या संस्थेने भेट म्हणून दिली. सर्व प्रकारच्या कौटुंबिक पार्श्वभूमी आणि समाजगटातील मुलांना वाचनाचा लाभ घेता यावा यासाठी हा उपक्रम राबवला गेला.

**‘डोनेट अ बुक’ या उपक्रमामुळे शाळा आणि संस्थांसाठी १०० हून अधिक वाचनालये उभी करण्यास सार्वजनिक निधीतून मदत झाली.**

**५५,००० हून अधिक पुस्तकांचे व ३०० हून अधिक एलआयसीजचे वाटप करण्यात आले.**

**भारतातील ५० हून अधिक शहरांमधील व गावांमधील २३ लाख मुलांनी याचा लाभ घेतला.**

**७०० हून अधिक देणगीदार**

# देणगीदार

## २०२२-२३ करता वैयक्तिक देणगीदार

वाचनाचा आनंद पसरवण्याच्या आमच्या प्रयत्नात तुम्ही आमच्यासोबत सहयोह करू इच्छित असाल, तर कृपया grants@prathambooks.org वर इ-मेलद्वारे संपर्क साधा.

# वित्तीय अहवाल

**Pratham Books**

**Balance sheet as at March 31, 2023**

*(Amount in Rupees)*

| Particulars | Sch No. | As at March 31, 2023 Amount | As at March 31, 2022 Amount |
|---|---|---|---|
| **Liabilities** | | | |
| Corpus Fund | 1 | 10,11,68,543 | 8,65,63,766 |
| Specified Fund | 2 | 5,03,01,352 | 7,17,35,307 |
| Current Liabilities | 3 | 1,55,66,256 | 1,82,79,129 |
| Provisions | 4 | 41,07,473 | 29,40,689 |
| Other advances | 5 | 6,20,586 | 6,91,391 |
| **Total** | | **17,17,64,209** | **18,02,10,282** |
| **Assets** | | | |
| Fixed Assets | 6 | 24,41,933 | 22,51,602 |
| Deposits | 7 | 9,63,56,774 | 10,08,13,996 |
| Debtors | 8 | 29,94,427 | 68,26,803 |
| Loans and advances | 9 | 10,57,771 | 17,18,099 |
| Stock of Books | | 63,92,040 | 77,05,011 |
| Cash in Hand | | 13,440 | 8,740 |
| Cash at Bank | 10 | 5,59,18,084 | 5,56,29,623 |
| Specified Fund Receivable | 11 | 2,60,003 | - |
| Other Current Assets | 12 | 63,29,737 | 52,56,407 |
| **Total** | | **17,17,64,209** | **18,02,10,282** |
| Significant Accounting Policies and notes to accounts | 30 | | |

**for Pratham Books**

R Sriram
Chairperson

Suzanne Singh
Trustee

Bengaluru
September 21, 2023

As per our report of even date
**for Singhvi Dev & Unni LLP**
**Chartered Accountants**
Firm Reg No 003867S/ S200358

Shashi Kumar H D
Partner
Membership No.: 235431
UDIN: 23235431BGQRTD3650

Bengaluru
September 21, 2023

**Pratham Books**

**Income & Expenditure for the year ended March 31, 2023**

*(Amount in Rupees)*

| Particulars | Sch No. | As at March 31, 2023 Amount | As at March 31, 2022 Amount |
|---|---|---|---|
| **Income** | | | |
| Sale of Books | 13 | 7,22,51,678 | 7,04,51,825 |
| Donations received | 14 | 79,73,670 | 70,22,690 |
| Other Income | 15 | 76,56,613 | 86,08,003 |
| Income from Funds | 16 | 7,96,43,198 | 10,17,84,589 |
| **Total (A)** | | **16,75,25,159** | **18,78,67,106** |
| **Expenditure** | | | |
| Book Development Expenses | 17 | 2,80,32,882 | 1,22,98,263 |
| Selling & Administrative Expenses | 18 | 1,94,58,435 | 1,85,68,538 |
| Staff Expenses | 19 | 2,47,53,402 | 2,43,93,196 |
| Promotional Expenses | 20 | 3,94,861 | 5,06,838 |
| Research & Evaluation Expenses | | - | - |
| Depreciation | 6 | 6,37,604 | 5,82,825 |
| Fund Expenditure | 21 | 10,06,12,911 | 10,11,87,604 |
| **Total (B)** | | **17,38,90,094** | **15,75,37,265** |
| **Excess of Income over expenditure (A-B)** | | (63,64,935) | 3,03,29,841 |
| **Add:** | | | |
| **Opening Balance in Funds** | | | |
| Opening Balance in Corpus Fund | | 8,65,63,766 | 5,68,30,909 |
| Opening Balance in Specified Fund | | 7,17,35,307 | 7,15,18,870 |
| **Balance of Funds after appropriations** | | | |
| Corpus Fund | | 10,11,68,543 | 8,65,63,766 |
| Specified Fund | | 5,03,01,352 | 7,17,35,307 |
| **Total balance in Funds** | | **15,14,69,895** | **15,82,99,073** |
| Significant Accounting Policies and notes to accounts | 30 | | |

**for Pratham Books**

R Sriram
Chairperson

Suzanne Singh
Trustee

Bengaluru
September 21, 2023

As per our report of even date
**for Singhvi Dev & Unni LLP**
**Chartered Accountants**
Firm Reg No 003867S/ S200358

Shashi Kumar H D
Partner
Membership No.: 235431
UDIN: 23235431BGQRTD3650

Bengaluru
September 21, 2023

**Pratham Books**

**Receipts and Payments account for the year ended March 31, 2023**

*(Amount in Rupees)*

| Particulars | Sch no. | Year ended March 31, 2023 Amount | Year ended March 31, 2022 Amount |
|---|---|---|---|
| **Receipts** | | | |
| Balance brought forward | | | |
| - Cash on hand | | 8,740 | 12,859 |
| - Cash at bank | | 5,56,29,623 | 3,23,86,168 |
| Sale of books | 22 | 7,60,21,404 | 7,11,27,960 |
| Donations | 23 | 79,73,670 | 70,22,690 |
| Other Income | 24 | 66,96,425 | 75,31,032 |
| Specified Funds | 25 | 7,95,20,218 | 10,17,84,589 |
| Fixed Deposits - Withdrawn | | 11,57,24,894 | 9,15,06,369 |
| Earnest Money Refund Received | | 72,141 | 3,13,880 |
| Income Tax Refund - Received (TDS) | | 13,25,281 | 10,60,810 |
| **Total** | | **34,29,72,396** | **31,27,46,357** |
| **Payments** | | | |
| Book Development Expenses | 26 | 3,06,72,715 | 1,12,84,777 |
| Selling, Administrative Expenses and Promotional Expenses | 27 | 1,97,05,301 | 1,88,72,827 |
| Staff Expenses | 28 | 2,35,82,788 | 2,38,49,771 |
| Fund Expenditure | 29 | 9,88,73,433 | 10,39,09,421 |
| Fixed Assets Purchased | | 8,27,935 | 2,11,280 |
| Fixed Deposits | | 11,12,88,813 | 9,88,16,981 |
| Gratuity- LIC Policy | | 13,14,641 | - |
| Specific Grant Balance Refund | | 7,24,246 | 65,797 |
| Earnest Money/Security Deposit | | 51,000 | 97,141 |
| Balance carried forward | | | |
| - Cash on hand | | 13,440 | 8,740 |
| - Cash at bank | | 5,59,18,084 | 5,56,29,623 |
| **Total** | | **34,29,72,396** | **31,27,46,358** |
| Significant Accounting Policies and notes to accounts | 30 | - | |

for Pratham Books

R Sriram
Chairperson

Suzanne Singh
Trustee

Bengaluru
September 21, 2023

As per our report of even date
**for Singhvi Dev & Unni LLP**
**Chartered Accountants**
Firm Reg No 003867S/ S200358

Shashi Kumar H D
Partner
Membership No.: 235431
UDIN: 23235431BGQRTD3650

Bengaluru
September 21, 2023

# विश्वस्त मंडळ

| नाव | पद | मंडळाच्या सभांसाठीच्या उपस्थिती (संख्या) | विश्वस्तांना मिळालेला मोबदला / प्रतिपूर्ती |
|---|---|---|---|
| अशोक कामत | विश्वस्त | ४ | शून्य |
| हरित नागपाल | विश्वस्त | २ | शून्य |
| एम. एस. श्रीराम | विश्वस्त | ४ | शून्य |
| परवीन वर्मा | विश्वस्त | ० | शून्य |
| आर श्रीराम | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त | ४ | शून्य |
| रेखा मेनन | विश्वस्त | ० | शून्य |
| श्रीकांत नादमुनी | विश्वस्त | २ | शून्य |
| सुझन सिंग | विश्वस्त | २ | शून्य |

**संस्थेचे विश्वस्त वर्षभर संस्थेच्या कामाच्या विविध पैलूंमध्ये सक्रियपणे सहभागी होऊन औपचारिक बैठकींच्या पलीकडे जाऊन आपले योगदान देतात.**

**अशोक कामत** सुरुवातीपासूनच सह-संस्थापक विश्वस्त म्हणून प्रथम बुक्सचा महत्त्वाचा घटक आहेत. ते ‘अक्षरा फाऊंडेशन’चे नेतृत्व करतात. भारतातील शैक्षणिक असमानता दूर करण्यासाठी ते कटिबद्ध आहेत. विकासापूरक बदलांसाठी शाश्वत मॉडेल्स तयार करण्यात आणि ती मोठ्या प्रमाणावर राबवण्यासाठी सरकारच्या राज्य नेतृत्वापासून ते तळागाळापर्यंतच्या सर्व स्तरांशी सहयोग कसा साधावा हे अशोक यांच्याकडून शिकण्यासारखे आहे.

**हरित नागपाल** यांना व्यवसाय चालवण्याची मर्मदृष्टी आहे व संपूर्ण भारताच्या पातळीवरच्या व्यावसायिक कार्ययोजना राबवण्याचा अनुभव आहे. आमच्या उपक्रमाला मोठ्या प्रमाणावर राबवण्यासाठी तत्कालीन वास्तव परिस्थिती समजून घेणे व वापरकर्त्यांची भूमिका समजावून घेणे यांसाठी ते मदत करतात.

**परवीन वर्मा** क्रायच्या (CRY) नेतृत्वपदी असून मुलांच्या गरजा समजून घेण्याची सहवेदना आणि समज त्यांच्याकडे आहे. त्यामुळे मुलांपर्यंत कसे पोहोचायचे आणि पुस्तकांद्वारे त्यांवर कसा सकारात्मक प्रभाव टाकायचा यातील त्या तज्ज्ञ आहेत.

**रेखा मेनन** या संस्थापक विश्वस्त आहेत. कॉर्पोरेटमधील शिस्तबद्धता आणि समाजोपयगी उद्देशाकडे वाटचाल या दोहोंचाही त्या सुरेख मेळ घालतात. त्या नेहमीच भविष्याचा आणि बदलांमुळे होणाऱ्या मोठ्या प्रभावाचा विचार करत असतात.

**एम. एस. श्रीराम** हे शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून ते लेखकदेखील आहेत. ट्रस्टचे व्यवस्थापन करण्याच्या व्यावहारिक मुद्दे आणि संकल्पनात्मक मुद्दे यांना गुंफून ते प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यास मार्गदर्शन करतात.

**श्रीकांत नादमुनी** मुलांना तंत्रज्ञानविषयक संकल्पना सोप्या भाषेत समजाव्यात यासाठी आपल्या तंत्रज्ञानाच्या सखोल ज्ञानाचा वापर करतात. त्यांनी स्वतः कार्यक्षेत्रात सहभागी होऊन हे काम केले आहे. तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवण्यामध्ये ते कुशल आहेत.

**सुझन सिंग** यांनी अनेक वर्षांपासून संस्थेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त म्हणून नेतृत्व केले आहे. स्टोरीविव्हरसोबतच इतर अनेक नवोन्मेषशाली कल्पनांना त्यांनी सुरुवात केली असून पुढे त्यांचा मोठ्या प्रमाणावर विस्तारही केला आहे. त्या नेहमी एकाग्रतेने काम करतात, त्यांचे प्रत्येक गोष्टीकडे बारीक लक्ष असते. त्यांचे एकच ध्येय आहे - प्रत्येक मुलाला पुस्तक वाचनाचा आनंद घेता आला पाहिजे.

**आर. श्रीराम** पुस्तकांबद्दल आणि वाचनाच्या आनंदाबद्दल अत्यंत उत्साहाने कार्य करत असतातत. उद्योजक या भूमिकेतून ते आपली मते मांडत असतात. विविध व्यवसाय व ना-नफा संस्थांसोबत केलेल्या कामांचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. आर. श्रीराम सध्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त या भूमिकांमधून प्रथम बुक्सच्या टीमला मार्गदर्शन करत आहेत.

# चित्रांकन श्रेय

या वार्षिक अहवालातील चित्रे खाली नमूद केलेल्या प्रथम बुक्सच्या गोष्टीच्या पुस्तकांमधून घेण्यात आली आहेत :

| शीर्षक | चित्रांकन | लेखक |
|---|---|---|
| *चकाचक चीकू* | मानसी पारेख | लवलीन मिश्रा |
| *मला चालवायची आहे मोटरसायकल* | राय | आरती पार्थसारथी |
| *डॉ. बाबासाहेब आंबेडकर: ग्रंथप्रेमाने भारलेले जीवन* | निधिन शोभना | योगेश मैत्रेय |
| *अंधाराचा आवाज कसा असतो?* | कृष्ण बाळा शेणॉय | अपर्णा कपूर |
| *पुचकूचे साहस* | राजीव आईप | दीपांजना पाल |
| *ग्रेस : विज्ञानशिक्षणाची दारे सर्वांना खुली करण्यासाठी एका इंजिनियरने दिलेला लढा* | प्रिया दाली | सायंतन दत्ता |
| *गोल!* | अल्फिया हसन आणि पायरो ड्रॉंज | नेहा सिंग आणि सबा खान |
| *गुप्तहेर दमयंती* | निवेदिता सुब्रमण्यम | निवेदिता सुब्रमण्यम |
| *एक पुस्तक, पुचकूसाठी* | राजीव आईप | दीपांजना पाल |
| *माझे जवळचे मित्र* | रिषभ बंशकार | रमा हर्डीकर - सखदेव |
| *संग्रहालयातला एक दिवस* | अन्वर चित्रकार | अनु चौधरी - सोराबजी |
| *अफो आणि मी* | कनातो जिमो | कनातो जिमो |
| *अवकाशातील गाणे : केसरबाई केरकर* | शुभश्री माथूर | नेहा सिंग |
| *सोंथ आला रे!* | गझल कादरी | गझल कादरी |




**PRATHAM BOOKS**

#621, 2nd floor, 5th Main, OMBR Layout,
Banaswadi, Bengaluru 560043
T: +91 80 42052574 / 41159009
New Delhi | T: +91 11 41042483

www.prathambooks.org
www.storyweaver.org.in
www.donateabook.org.in